# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर
## कंत्राटी तत्वावर पदभरतीकरीता जाहीरात
## सन २०२१-२२

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांतर्गत तसेच जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर करीता खालील तक्त्यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी तत्वावर खालील रिक्त पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ क्र | प्रोग्रामचे नांव | मंजुर पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | नियुक्तीचे ठिकाण | प्रवर्ग | शेक्षणिक पात्रता | वय मर्यादा | दरमहा एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | SNCU | Medical Officer | 1 | Daga Hospital Nagpur | OBC-3, EWS- 1, Open-1 | 1) MBBS Registered by MMC<br>2) DCH/MD असल्यास प्राधान्य<br>3) संगणकाचे ज्ञान असल्यास प्राधान्य | ४३ वर्ष मागास वर्गीय प्रवर्गासाठी/ ३८ वर्ष खुला प्रवर्ग तथा एमबीबीएस यांची वयोमार्यादा ७० वर्ष | Rs. 60,000/- |
| २ | ICU/HDUs | Medical Officer | 4 | Daga Hospital, Nagpur and RH Katol | | | | Rs. 60,000/- |
| ३ | E-sushrut | Facility Manager | 2 | Dist. Mental Hospital, Nagpur and Daga Woman Hospital, Nagpur | SC-1, Open-1 | 1) MCA/B.Tech or Equivalent<br>2) 1-3 Years Experience | | Rs. 25,000/- |
| ४ | Tribal Cell | Tribal Cell Coordinator | 1 | GMC, Nagpur | SC-1 | 1. SSC Pass<br>2. चांगले संवादकौशल्य, कोरकु भाषा बोलता येणे आवश्यक | | Rs. 15,500/- |
| ५ | PCPNDT | Legal Councellor | 1 | Civil Surgeon Office, Nagpur | Open-1 | 1) LLB<br>2) 3 Year Experience | | Rs. 40,000/- |
| **एकूण रिक्त पदे -** | | | **9** | | | | | |

**अटी व शर्ती -**

सविस्तर जाहिरात अटी, शर्ती तथा अर्जासह **www.nagpurzp.com** वर उपलब्ध आहे.

**आवश्यक कागदपत्रे :-** खालील कागपत्रांची मुळ प्रतीची छायांकिंत प्रत स्वसाक्षांकित करुन अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

१) पदवी/पदव्यूत्तर पदवी/पदविका प्रमाणपत्रे २) गुणपत्रिका (सर्व) ३) इतर शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे (असल्यास) ४) संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र ५) जातीचे प्रमाणपत्र ६) शाळा सोडल्याचा दाखला/जन्म तारखेचा दाखला ७) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र ८) वैद्यकिय अधिकारी पदाकरीता रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट ९) पासपोर्ट आकाराचा फोटो १०)RTGS/NEFT/IMPS व्दारे अर्जशुल्काचा भरणा केल्याची पावती.

**अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक :- दि.१०/०६/२०२२** सायंकाळी ५.०० पर्यत (**शासकीय सुट्टीचे दिवस वगळून**)

**- अर्ज स्विकारण्याचे ठिकाण खालीलप्रमाणे -**

| अ.क्र | पदाचे नांव | अर्ज स्विकारण्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | Medical Officer (SNCU & ICU/HDUs) | राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन, नागपूर |
| २ | Facility Manager | |
| ३ | Tribal Cell Coordinator | |
| ५ | Legal Councellor | |

**टिप** - वरीलपैकी पदांकरीता पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येईल. जर सदर दिवशी शासकिय सुट्टी असल्यास दुसऱ्या दिवशी प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येईल.

**नोंदणी/मुलाखत स्थळ** :- राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन, नागपूर

**अटी व शर्ती-**

१. वरील सर्व पदे हि **निव्वळ कंत्राटी स्वरुपाची** असुन त्यांचा कालावधी दि. ३१/०३/२०२३ पर्यत राहील. हा कालावधी वाढविला जाण्याची शक्यता आहे परंतू सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही.

२. सदर पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. म्हणून अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३. अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा, अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४. उपरोक्त सर्व पदासाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

५. सदर रिक्त पदांच्या संख्येत, ठिकाण व मानधनात बदल होवू शकतो.

६. अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकांस प्राधान्य दिले जाईल.

७. जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष, मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील तथा एमबीबीएस,विशेषज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेतज्ञ यांची वयोमार्यादा ७० वर्ष व रुग्णसेवेशी संबंधित पदाकरीता वयोमार्यादा ६५ वर्ष राहील.

८. उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही थेट मुलाखतीव्दारे घेण्यात येत असल्यामुळे जाहीरातीमधील नमूद दिनांकास विहीत कालावधीत सोबत दिलेल्या अर्ज नमुन्यात मुळ शैक्षणिक कागदपत्राच्या सत्यप्रतीसह या कार्यालयात अर्ज सादर करावा, त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत.

९. संबंधित पदाकरीता नोंदणी नंतर पात्र, अपात्र यादी प्रसिध्द दिनांकास कार्यालयात सुचना फलकावर तथा कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासंबंधी आक्षेप असल्यास वरील नमूद प्रमाणे सकाळी १० ते ५ पर्यत घेवून निराकरण केले जाईल त्यानंतर प्राप्त आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

१०. अर्जदाराला सोईनुसार पदस्थापनेचे ठिकाण बदलवून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

११. उपरोक्त संबंधीत पदाकरीता तत्सम कॉन्सीलकडून रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा उमेदवारांस मुलाखतीस अपात्र ठरवल्या जाईल.

१२. ज्या आशा स्वयंसेविकांनी एएनएम/जीएनएम कोर्स पुर्ण केलेला आहे त्यांना एएनएम/जीएनएम पदभरतीमध्ये वयाची अट राहणार नाही व पदभरतीमध्ये प्राधान्य देण्यात येईल.

१३. एकापेक्षा जास्त ठिकाणी कार्यरत असल्यास उमेदवाराने अर्ज करण्यात येवू नये. निवड उपरांत तत्सम बाब कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास नियुक्ती तात्काळ रदद् करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

१४. मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१५. जाहीरातीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या पदाकरीता नोंदणी केलेल्या उमेदवारांची संख्या विचारात घेवून खालील निकषाप्रमाणे यादी प्रसिध्द करण्यात येईल.

अ) शैक्षणिक अंतिम वर्षाचे गुणांच्या ७०%

ब) पदव्यूत्तर पदवी असल्यास १० गुण व पदव्यूत्तर पदविका असल्यास ५ गुण (उच्च शैक्षणिक अर्हता) अतिरिक्त देण्यात येतील (जास्तीत जास्त १० गुण त्यापैक्षा जास्त नाही) परंतू अ व ब ची एकत्रित बेरीज ७०% पेक्षा जास्त असणार नाही.

क) उमेदवारास शासकिय, निमशासकिय, शासन अंगीकृत संस्था व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रत्येक १ वर्षाकरीता ४ गुण त्यानुसार जास्तीत जास्त २० गुण देण्यात येईल.

ड) विषय तज्ञासाठी Skill Assessment Protocol व मुलाखत या करीता १० गुण असे मिळून एकूण १०० गुण देण्यात येतील.

ई) ज्या पदाकरीता Skill Assessment Protocol लागू नाही अशा पदांकरीता अ,ब व क प्रमाणे एकूण गुणनिश्चिती करण्यात येईल. तसेच Skill Assessment Protocol लागू असलेल्या पदांना Skill Assessment Protocol नुसार गुणनिश्चिती करण्यात येईल.

१६. मा. मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक कार्यालय, नागपूर यांच्या बिंदुनामावलीप्रमाणे आरक्षणामध्ये बदल झाल्यास उमेदवारांना कोणतीही पुर्व सुचना न देता कमी करण्यात येईल.

१७. बिंदु नामावलीनुसार राखीव प्रवर्गास अनुसरुन पदभरती जाहिरात दिल्यानंतर पुढील प्रक्रियेव्दारे अपेक्षित राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदाच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेवून ११ महिने कालावधीसाठी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

१८. शासकिय सेवानिवृत्त अधिकारी यांचेकरीता वयोमर्यादा ६५ वर्ष असेल तसेच अनुभवास प्राधान्य असेल. वर्ग -३ व वर्ग-४ च्या पदावरुन निवृत्त झालेले कर्मचारी कंत्राटी पदावर अर्ज करण्यासाठी दि. १७/१२/२०१६ रोजीच्या शासननिर्णयाव्दारे अपात्र आहेत.

१९. सेवानिवृत्त उमेदवारांना मानधन शासननिर्णय क्र. संकिर्ण -२७१५/प्र.क्र./१००/१३ दि. १७/१२/२०१६ नुसार अदा करण्यात येईल. (गट क व गट ड वगळता)

२०. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा कोणत्याही प्रकारे फौजदारी प्रकरण नसावे.

२१. वैद्यकिय अधिकारी (एम.बी.बी.एस), विशेषज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेषज्ञ यांना ७० वर्ष व इतर रुग्ण सेवेशी संबंधित पदांसाठी (उदा. परिचारीका, अधिपरिचारीका, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषध निर्माण अधिकारी) वयोमर्यादा ६५ वर्ष राहील.

२२. मागासर्वीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. १००/- व खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी रु. १५०/- चे बॅक ऑफ महाराष्ट्र बॅंकेचे **जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर खाते क्र. 60403391534, IFSC Code – MAHB0001321 वर RTGS / NEFT/IMPS व्दारे** भरणा करुन पावती फार्म सोबत जोडावे. .

२३. ज्या पदाकरीता आवश्यक अनुभव मागीतलेला आहे परंतू आवश्यक अनुभव असलेले उमेदवार उपलब्ध न झाल्यास अनुभवाची अट शिथील करण्याचे संपुर्ण अधिकार जिल्हा निवड समितीकडे राखीव असतील.

२४. संपूर्ण निवडप्रकिया ही गुणवत्तेवर आधारीत पारदर्शी पध्दतीने घेण्यात येईल.

२५. भरती प्रक्रिया स्थगिती देणे/रद् करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, निवड समिती, रा.आ.अ. नागपूर यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर